REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 10 | JULY - 2018

# कृषिसंस्कृतीची बदलती रूपे

डॉ. वामन जाधव
मराठी विभाग , सहयोगी प्राध्यापक , मा. ह. महाडिक महाविद्यालय मोडनिंब.

**प्रस्तावना :**



विज्ञानाच्या प्रचार आणि प्रसाराने खेडी आपले रूप बदलत आहेत. टी. व्ही., वर्तमानपत्रे, रेडिओ आज खेड्यात पोहोचली आहेत. खेड्यातील समाज जीवनात सामाजिक, राजकीय, आर्थिक, आणि सांस्कृतिक परिवर्तन झालेले दिसून येते. खेड्यातील संस्कृती ही प्रामुख्याने कृषिसंस्कृती असते. कृषिसंस्कृतीत व्यक्ती, कुटुंब, जात, गावगाडा व प्रशासन असे सूत्र असते. बदलत्या ग्रामीण जीवनात हे सूत्र विस्कटलेले दिसून येते. कृषिसंस्कृतीत संयुक्त कुटुंब पद्धती खूप महत्त्वाची असते. कारण शेती व्यवसायाला मनुष्यबळाची आवश्यकता असते. पूर्वी शेतकऱ्याचा भला मोठा वाडा असायचा. त्यात पणजोबा-पणजी, आजोबा-आजी, आई-वडील, भाऊ-बहीण अशी सर्व नात्यागोत्यातील माणसे गुण्यागोविंदाने राहत असत. आता विभक्त कुटुंब पद्धतीचा स्वीकार शेतकऱ्यांनी केलेला दिसतो. कृषिसंस्कृतीत बारा बलुतेदार व आलुतेदार यांना महत्त्व असते. वर्षभर शेतीच्या कामाला ही मंडळी मदत करीत सते. त्यातून शेतकरी प्रत्येकाला त्याच्या कामाप्रमाणे हिस्सा देत असे. त्याचप्रमाणे सुगीच्या दिवसात फिरस्ते येत असत, त्यांनाही शेतकरी थोडाफार हिस्सा देत असे. १९६० च्या नंतर फुले, शाहू, आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याने ग्रामीण भागात उच्च शिक्षणाच्या सोयी उपलब्ध झाल्यामुळे शिक्षण खेड्यापाड्यात पोहोचले. शिक्षणाने माणूस सुसंस्कृत झाला, आणि रूढी परंपरेने आलेले काम करण्यास बलुतेदार व आलुतेदार यांनी नकार दिला. साहजिकच बलुतेदारी मोडकळीस आली. त्यामुळे शेती व्यवसायाची बरीच कामे आधुनिक तंत्राने केली जाऊ लागली. पूर्वी ज्या शेतकऱ्याच्या दारात बैलगाडी आहे, ज्याचा गायगुरांचा मोठा आहे. यावरून तो शेतकरी सधन आहे असे मानले जाई. परंतु आज घडीला शेतकऱ्याच्या दारात बैलाची जोड दिसत नाही. त्याची जागा ट्रॅक्टरने घेतली आहे. पूर्वी मोट ओढण्याचे काम बैलाने केले जात असे. त्या ठिकाणी इंजिन व इलेक्ट्रिक मोटारी आल्या. तसेच दारात देशी गाई होत्या. त्यांचे तोंड पाहणे शुभ मानले जाई. परंतु आज संकरीत गाई शेतकऱ्याच्या दारात दिसतात. पूर्वी शेतकऱ्याच्या घराची रचनाही विशिष्ट पद्धतीची होती. भला मोठा वाडा, त्याच्यासमोर गाई गुरांसाठी गोठा, त्याला लागून शेळ्या मेंढ्यासाठी छोटी छपरी, एका बाजूला कोंबड्यांसाठी खुराडा अशी सर्व प्राण्यांवर नजर राहील अशी घराची रचना होती. आज घडीला मात्र सिमेंटची पत्र्याची बांधीव घरे उभी राहिली आहेत. शेतकऱ्याच्या घरात देव्हारा होता. त्याची जागा टी. व्ही. ने घेतली आहे. पूर्वी सकाळी आरत्या म्हणत असत. आत कॅसेटवर गाणी वाजवली जातात. तुळशीवृंदावनाच्या कट्ट्यावर बसून आजी आजोबा राम लक्ष्मणाच्या गोष्टी सांगत. आता त्याजागी घरातील जाणकार माणसे बसून राजकारणाच्या गप्पा मारतात. शेतकऱ्याच्या पोषाखात, बोलण्यातही रूमणं, भाला, लोढणं, मुंगसं असे कृषिसंस्कृतीशी निगडीत असणारे शब्द त्याच्या तोंडी दिसत नाहीत. कनेक्शन, लाईट असे इंग्रजी भाषेतील शब्द तो बोलताना दिसतो. काळ्या आईवर अपार प्रेम, देव देवतांवर श्रद्धा, कमालीची सहनशीलता, श्रम करण्याची इच्छा ही शेतकऱ्याच्या जीवनाही वैशिष्ट्ये पूर्वीसारखी ठळक स्वरूपात दिसत नाहीत. त्यातही बदल झालेला दिसून येतो.

**अंगण**

कृषिसंस्कृतीत अंगण या शब्दाला अनेक अर्थाने महत्त्व आहे. माणूस जन्मल्यापासून ते मृत्यूपर्यंत त्याचा आणि अंगणाचा घनिष्ठ संबंध येतो. गायीच्या शेणाने सारवलेले हे अंगण ही घराची शोभा वाढविते. सकाळी सूर्याच्या सोनेरी किरणांनी हे अंगण उजळून निघते. पारिजातक, चाफा अशा फुलांचा सडा अंगणात पडतो. त्या फुलांच्या सुगंधाने अंगण दरवळून जाते. अशा अंगणात उभे राहून तुळशीची पूजा केली जाते. सूर्याला नमस्कार केला जातो. घरातील बरेचसे कुळाचार अंगणात केले जातात. लोकसंस्कृतीचया उपासकांचे आगमन ही ह्याच अंगणात होते. बाळाच्या वाटीतील दूध–भात खाण्यासाठी चिऊ–काऊ याच अंगणात येतात. सुगीच्या दिवसात धान्याची भरणे–निवडणे याच अंगणात केले जाते. बारसे, साखरपुडा, लग्न, मुंज अशा कार्यक्रमासाठी या अंगणातच मांडव सजवला जातो. चांदण्याच्या शितल प्रकाशात आजी–आजोबा आपल्या नातवंडांना गोष्टी याच अंगणात सांगत असतात. असे मानवी जीवनाला व्यापून राहणारे अंगण नवी पिढीला जीवन जगण्यासाठी मूल्ये देत होते. नैतिकतेचे अधिष्ठान देत होते. माणसाचे सांस्कृतिक भरण–पोषण याच अंगणात होत होते. लहानपणी अंगणातील त्याच्या पायाला लागलेली माती व त्या मातीचा वास आयुष्यभर त्याच्या बरोबर राहात होता. त्यामुळे शेवटपर्यंत अंगणाची अनामिक ओढ त्याला लागून राहत होती.

आज अंगण ही संकल्पना ग्रामीण जीवनातून हळूहळू लोप पावत आहे. अंगणभर बसणारी माणसे आता दुर्मीळ झाली आहेत. दिवसेंदिवस खेड्यातील माणूस एकलकोंडा होत चालला आहे. माणसामाणसात असणारा जिव्हाळा हळूहळू कमी होत चालला आहे. अंगणाला आता`शेणा–मातीचा वास येत नाही. बाळ्याच्या वाटीतील दूध भात खाण्यासाठी चिऊकाऊ आता अंगणात येत नाहीत. पाहुण्यांच्या आगमनाची सूचना देणारा काऊदादा आता अंगणात येत नाही. आजी–आजोबा ही नाती नावापुरतीच शिल्लक राहिली आहेत. यंत्र संस्कृतीच्या आगमनाने अंगण ही संकल्पना उद्ध्वस्त झाली आहे.

**दावण**

कृषिसंस्कृतीमध्ये दावण या शब्दाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ज्याची दावण मोठी तो शेतकरी मोठा असे पूर्वी मानले जाई. शेतकऱ्याच्या घरासमोर तुळशीवृंदावन व गुराची दावण हमखास असे. त्यात खिलारी गाय, बैल याची जागा घरासमोर असे. झोपेतून उठल्याबरोबर गायीचे–तुळशीचे दर्शन व्हावे अशी शेतकऱ्याची धारणा असे. त्यातच एका बाजूला चार–दोन म्हशी, बारकी रेडकं यासाठी जागा ठरलेली असे. भला मोठा गोठा त्यात या दावणी असत. तो गोठाही विशिष्ट पद्धतीने केलेला असे. चारीही बाजूनी हवा मोकळी राहील अशी त्याची रचना असे. घराच्या एका बाजूला छपरी असे. त्यात शेरडा–करडाची दावण असे या छपराला चारही बाजूने कुड घेतलेला असे. लांडग्यापासून संरक्षण म्हणून अशी रचना जाणीवपूर्वक केलेली असे. दगडी, जेल्या, हरणदोडीचा पाला, दुधानी असा झाडपाला शेळ्यासमोर टाकला जात असे आणि हा झाडपाला सहजासहजी उपलब्ध होत असे. शेळीचे दूध आरोग्याला चांगले असे. शेतकऱ्यांचे मत असे. ओल्या वैरणीचा मान गाई व बैलाला दिला जाई. त्यांच्या खाली राहिलेली चिपाडं रेड्याच्या पुढे टाकली जात असत. गाईच्या पोटात ३३ कोटी देव असतात. असे समजून शेतकरी दिवसातून एकदा तरी गाईचे दर्शन घेत असे. गाईची शेपटी आपल्या डोळ्याला लावीत असे. दारात गाई व तुळशीवृंदावन असलेच पाहिजे. असा शेतकऱ्याचा अट्टाहास असे. त्याबरोबर रानाची मशागत करणारे बैल खऱ्या अर्थाने भूदेव, त्यासाठी पोळ्याच्या सणात तो बैलाला औताला जुंपत नाही. त्याला ओली वैरण, गोड नैवद्य त्याच्या तोंडी देतो. शेतकरी त्या दिवशी तो स्वतः उपवास करतो. कोंबड्यांसाठी झाप विणून घेत असे. गाई शिवाय घरातील मांजर, दारातील कुत्रा असा शेतकऱ्याचा गोतावळा असे. त्यातील एकजरी प्राणी शेतकऱ्याच्या दृष्टीस नाही पडला तर त्याची शोधाशोध सुरू होते. तो स्वतःच्या कुटुंबाइतकीच त्याची काळजी घेत असे. मात्र यंत्रसंस्कृतीच्या आगमनाने शेतकऱ्याच्या घरासमोरील दावणीचे स्वरूप बदलले. पूर्वी गोठ्याची जागा आता पत्र्याच्या शेडने घेतली आहे. देशी गाईच्या जागी जर्सी गायी आल्या आहेत. ओली वैरण, बरोबर तांब, कळणा, पेंड असे खुराक सध्या दिले जातात. दूध काढण्यासाठी चरवी वापरली जाई. त्याची जागा आता बादलीने घेतली आहे. दूध नेण्यासाठी दुधवाला येत असे. आता त्याची जागा दूध डेअरीने घेतली आहे. गाईच्य हंबरण्याने पहाटेचे वातावरण उजळून निघे, अधिक प्रसन्नमय होई. वासराच्या वात्सल्याने तिचे ओढ घेणे, वासराला चाटणे, उंच शेपटी करून त्या वासराने इकडून तिकडे धावणे, हे पाहून शेतकरी तृप्त होत असे. आत जर्सी

गाईला खोंड झाल्यास त्यास मारून टाकतात. त्याठिकाणी भुस्सा भरूनं कृत्रिम वासरू तयार करतात. गाईच्या समोर ठेवतात व दूध संपेपर्यंत पिळत राहतात. शेतीच्या मशागतीसाठी लागणारे बैल, रेडा हे प्राणी तर जवळजवळ नाहीसे झाले आहेत. पूर्वी प्राण्याबद्दल असणारा जिव्हाळा दिसत नाही. आता दावण हा शब्द हळूहळू लोप पावत आहे.

### धोकटी

खेड्यातील संस्कृती प्रामुख्याने कृषिसंस्कृती असते. कृषिसंस्कृतीत व्यक्ती, कुटुंब, जात, गावगाडा व प्रशासन असे सूत्र असते. बलुतेदार, आलुतेदार, फिरस्ते हे घटक या संस्कृतीवर अवलंबून असतात. कृषिसंस्कृती बदलत गेली तशी बलुतेदारी हळूहळू संपुष्टात आली. पण काही बलुतेदार आपला परंपरेचा व्यवसाय करताना दिसतो. त्यात नाभिकाचा व्यवसाय ठळकपणे पुढे येतो. पूर्वी अनवाणी पायाने तो वाडीवस्तीवर फिरत होता. एका हजामतीसाठी त्याला चार पायल्या (धान्य) वर्षाकाठी बलुते दिले जाई त्या दिवशी भाकर-चटणी दिली जाई शिवाय जावळ काढणे, शेंडी राखणे अशावेळी त्याला चोळीचा खण, शिधा, ओटी भरण्याचे सामान, एखादे नाणे दिले जात असे. शिवाय मृत्यूनंतर तिसऱ्या दिवशी मुंडण केले जाते अशावेळी त्याला एखादे नाणे दिले जाई. गावात एखाद्या झाडाखाली आपली धोकटी, लोखंडी वस्तारा, आयना, एखादी फणी, धारेचा दगड, एखादी वाटी असे सामान घेऊन तो बसत असे. तो सर्व गावभर फिरत असल्यामुळे वेगवेगळ्या ठिकाणची माहिती त्याच्याजवळ संकलित होत असे. त्यामुळे गावातील कोणतीही बातमी त्याच्याजवळ खात्रीलायक मिळत असे. मालक, कारभारी, राव असे त्यांच्या नेहमी बोलण्यातील शब्द असत. खेड्याचे हळूहळू शहरीकरण सुरू झाले. तसे खेड्यात पानाच्या टपऱ्या, चहाची दुकाने थाटली जाऊ लागली. तशीच नाभिकाची दुकानेही दिसू लागली. कटिंग सलून, हेअर ड्रेसर्स, हेअर स्टाईल, जेन्टस् पार्लर अशा इंग्रजी नावच्या पाट्या त्यांच्या दुकानावर दिसून येतात. ब्लेड-वस्तारा, ब्रश, क्रीम, पावडर, सेंट, तेल, कंगवे अशा अत्याधुनिक वस्तू त्यांच्या दुकानात दिसतात. शिवाय मेकअप, क्लप, सेव्हिंग, मसाज असे इंग्रजी शब्द बोलताना तो दिसतो.

गावभर फिरणारा, वाडीवस्तीवरची प्रत्येक पाऊलवाट तुडवणारा असा हा नाभिक व्यवसाय स्थिर झालेला दिसतो. लहानपणीच परंपरेने आलेला व्यवसाय त्याच्याकडे येतो. अंगणात खेळण्याचे-बागडण्याचे वय असते त्याच वयात त्याच्या हातात वस्तारा जातो. लहानपणीच पैसा हाती पडतो. त्यामुळे त्याला शिक्षणाची गोडी राहात नाही. म्हणून आजही खेड्यात हा समाज शैक्षणिकदृष्ट्या म्हणावा तसा प्रगत झालेला दिसून येत नाही. मात्र परंपरेने आलेल्या त्याच्या व्यवसायात बदल झालेला दिसून येतो.

### मास्तर

कृषिसंस्कृतीत शेती आणि शेतकरी, शाळा आणि शिक्षक, देऊळ आणि पुजारी हे घटक महत्त्वाचे मानले जातात. त्यात गुरूजी हा शब्द आदराने उच्चारला जात होता. पूर्वी शहर आणि गाव यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा म्हणजे शिक्षक हाच होता. सगळ्या गावाच्या विश्वासाचे  ठिकाण गुरूजी, एखाद्याचे टपाल वाचावयाचे असेल तर त्यांनी टपाल खिशात घालून सरळ गुरूजीकडे यायचे. घरात भांडण तंटा झाला असल्यास माझ्या पोराला चार शब्द सांगा म्हणून गावातली जाणती माणसं गुरूजीकडे यायचे, शहरातून एखादी वस्तू आणावयाची असल्यास, चार-दोन आणे मास्तरजवळ दिले जायचे. बाळाच्या काजळ डबीपासून ते आजच्या तपकीरीच्या डबीपर्यंत अशा छोट्या मोठ्या वस्तू गावातील माणसे गुरूजींना आणायला सांगत. गुरूजींना या वस्तू आणण्यात कमीपणा वाटत नसे, असे गुरूजी गावातून जात असताना बायकांच्या खांद्यावर आलेला पदर डोकीवर जात असे. एखादा बिडी ओढत असला तर अर्धी बिडी टाकून द्यायचा. तळहातावर मळलेली तंबाखू तो फेकून द्यायचा अन् आदबीने गुरूजी समोर उभा राहायचा. असा नैतिक धाक गुरूजीबद्दल खेड्यात होता. असे गावाला गावपण देणारी गुरूजी कमालीचे शिस्तप्रिय असत, गावांत एखाद्या मुलाने भांडण काढल्यास शेजारचा माणूस म्हणायचा, का रे? तुझ्या गुरूजींनी असे शिकवले का? एवढा गुरूजी आणि गावाचा अतुट संबंध होता. गावाला गावपण देण्यासाठी फार मोठी जबाबदारी गुरूजींवर होती. शाळा मास्तर, पोष्ट मास्तर आणि पिटी मास्तर हे गावातील श्रद्धास्थाने होती, पण गावातील बदलाने या श्रद्धास्थानाला तडे गेले. गावात विकासाचे वारे आले. जुन्या मूल्यांचा ऱ्हास होऊ लागला. शिक्षण दारोदारी आले.

त्यातच शिक्षणाचे बाजारीकरण, डोनेशन या गोष्टी जोर धरू लागल्या. पैसा देऊन शिक्षक होता येते ही मानसिकता बळावली. प्रेम, दया, करूणा या शिक्षणातून मिळणाऱ्या गोष्टी मातीमोल झाल्या. शिक्षकाकडून संस्काराची मूल्ये एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत जात होती. भ्रष्ट शिक्षण व्यवस्थेत ही प्रक्रिया थंडावली. गावाला नैतिकतेचे अधिष्ठान प्राप्त करून देणारी मास्तरची छडी हळूहळू नाहीशी होऊ लागली.

### गजरा

कृषिसंस्कृतीत गावाला गावपण येण्यासाठी अनेक घटक महत्त्वाचे असतात. कुटुंब, नाती–गोती, चालीरिती, रूढी–परंपरा, सण–समारंभ, देव–देवता, जत्रा असे अनेक घटक गावाला गावपण देत असतात. त्यात देव देवता हा घटक अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजा इतकाच महत्त्वाचा राहिला आहे. जेथ गाव वसले आहे तेथे देऊळ आहे. देऊळ नाही असा गाव शोधून सापडणार नाही. अशा देवळाची देखभाल गावातील पुजारी करीत असतो. तर त्या पूजेसाठी लागणारी फुले देण्याचे काम त्या गावातील माळी करीत असतो. पाटलाच्या वाड्यावर रोज फुले दिली जातात. माळी हा आलुतेदारांमध्ये येतो. दसरा, दिवाळी, पाडवा, गुढीपाडवा, सत्यनारायण पूजा शिवाय नामकरण विधी, लग्नविधी अशावेळी तो फुले पुरवितो. त्याच्या मोबदल्यात वर्षाकाठी ठरल्याप्रमाणे आलुते (धान्य) देण्याची प्रथा होती. शिवाय कार्यक्रमाच्या दिवशी ओटी भरण्याचे सामान, शिधा, एखादे नाणे दिले जात असे. तर लग्नकार्याच्यावेळी हार–तुरे, गजरे अशा फुलापासून निर्माण केलेल्या शोभेच्या वस्तू तो देत असे. कृषिसंस्कृतीत परिवर्तन घडून आले. तसेच देव–देवतांबद्दल असणारी श्रद्धा कमी होऊ लागली. वर्षातून एकदा भरणाऱ्या जत्रेचे चैतन्य हरवले. शिक्षणाने नवे बदल आणले. परंपरेने आलेली कामे माळी जातीतील नव्या पिढीने नाकारली. त्यांनी आपल्या व्यवसायात बदल घडवून आणला. तसे फुलांच्य व्यवसायातही बदल झाला. पूर्वी कन्हेर, तुळशीच्या मंजूळा, झेंडू, तरवडाची फुले अशा देशी फुलांच्या बागा तो जपत असे. पण आज घडीला तो गुलछडी, गुलाब, शेवंती, अस्टर, मोगरा, जुई, काकडा यासारखी आधुनिक आकर्षक, मन मोहून टाकणाऱ्या फुलांच्या बागा तो फुलवताना दिसतो. बाजारात फुले आणण्याच्या निमित्ताने त्याचा व शहराचा राजरोसपणे संबंध येऊ लागला. त्यामुळे त्यांच्या पोशाखात, बोलण्यात बदल झालेला दिसून येतो. महंगा, सस्ता, भाईसाब, अच्छा, सेंटेड, पॅकिंग, डायरी, फ्रेश असे इंग्रजी–हिंदी भाषेतील काही शब्द तो बोलताना दिसतो. अशा परंपरेने चालत आलेल्या त्याच्या व्यवसायात लक्षणीय बदल झालेला दिसून येतो.

### देव्हारा

देव–देवतांबद्दल अपार श्रद्धा हे कृषिसंस्कृतीचे वैशिष्टये आहे. जेथे जेथे लोकवस्ती वसली आहे. तेथे देव–देवतांची मंदिरे आहेत. पूर्वी गावाची ओळख मंदिरांच्या कळसावरून केली जात होती. ज्या मंदिराच्या कळस उंच तो गाव समृद्ध मानला जायचा. निसर्गाच्या कुशीत राहणाऱ्या मानवाने निसर्गातील अनेक घटकांना देवत्व बहाल केले आहे. त्याने कधी भू–मातेची, नदीची, तर कधी वृक्षाची पूजा केली आहे. आक्रमक झालेल्या अनामिक शक्तीला थोपविण्यासाठी त्याला देवत्व ही संकल्पना सूचली असावी. कृषिसंस्कृतीत ठिक–ठिकाणी त्याने देव देवता निर्माण केल्या आहेत. त्यात कृषिसंस्कृतीत त्यांची ठिकाणे ठरलेली आहेत. विहिरीच्या काठी पाणदेव असतो. शेतात बांधावर म्हसोबा असतो. ओढ्यात वेताळबा, पठाणसाब असतात. तालमीच्या बाजूला हनुमानाचे देऊळ असते. गावाच्या खालच्या बाजूस म्हणजेच दलित वस्तीच्या खाली मरिआईचे देऊळ असते. खोकलीआई, चिंध्यादेवी, महामायादेवी, रेणुका, यमाई, यल्लमा, तुकाई, सिधोबा, बिरोबा भैरवनाथ अशा अनेक देव–देवता कृषिसंस्कृतीत आपणास पहावयास मिळतात. वर्षातून एकदा एखाद्या देवाची जत्रा भरते. या जत्रा शक्यतो सुगी झाल्यावर असतात. यात्रेच्यावेळी गावाला चैतन्य देते. गाव एका विशिष्ट वातावरणाने भरला जातो. लेकी–बाळा सासरहून माहेरी येतात. पाऊलवाटा, ताज्या टवटवीत होतात. देवाचा भक्त त्याच्या अंगात शिवकळा येते. तो भाकणूक करतो. तो बोलू लागतो. पीक–पाणी, पाऊस–पाणी, महागाई याविषयी विचारणा होते. यावर खेड्यातील लोकांचा अपार विश्वास असतो. ज्यांच्या अंगात देव येतो त्याला झाड म्हणतात. त्या झाडाबद्दल गावातल्या माणसांची अपार श्रद्धा असते. अशा देव–देवता देवळात असतात. पण प्रत्येक माणसाच्या घरात देवासाठी देव्हारा असतो. घरात देव्हारा नाही असे घर

कृषिसंस्कृतीत शोधून सापडणार नाही. घर लहान असो की मोठे, तेथे देव्हारा नाही असे घर कृषिसंस्कृतीत शोधून सापडणार नाही. घर लहान असो की मोठे, तेथे देव्हारा हा असणारच. घरात एखाद्या कोपऱ्यात दगड–मातीचा एक छोटासा कट्टा, त्यावर पांढरे नवे कापड, त्यावर अनेक देव–देवतांच्या दगडी, लाकडी, चांदी, पितळेच्या अशा विविध धातूच्या मूर्त्या ठेवलेल्या असतात. घरातील प्रत्येक माणूस देव्हाऱ्यापुढे नतमस्तक होतो. घरातील जाणकार माणसं घराच्या बाहेर पडत असताना देव्हाऱ्यासमोर हात जोडून उभी राहतात. देव्हाऱ्यातील अंगारा कपाळी लावतात. मगच घराच्या बाहेर पडतात. अशी देव्हाऱ्याबद्दल अपार श्रद्धा लोकांच्या मनात होती. पण हळूहळू ही श्रद्धा कमी होताना दिसून येते. देव्हाऱ्याची जागा आता टी. व्ही. ने घेतली आहे. घरात देव–देवतांच्या आरत्या, देवळात भजन, कीर्तन असे कार्यक्रम माणसाला नैतिक अधिष्ठान प्राप्त करून देत होते. पण बदलत्या कृषी जीवनात ह्या गोष्टी हळूहळू लोप पावत असताना दिसतात.

**संदर्भः–**

1.ग्रामीण साहित्याने शेतकरी जीवन वामन जाधव सुविद्या प्रकाशन सोलापूर.
2.**तिफणसाज इंद्रजित** bhalrao **मनोविकास प्रकाशन पुणे**